# पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी - ४११०१८
## मा.इ प्रभाग समिती
## कार्यपत्रिका क्रमांक -४
## सभावृत्तांत

**दिनांक - ०६/०७/२०१८** **वेळ दुपारी ०२. ०० वा.**

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या इ प्रभाग समितीची मासिक सभा शुक्रवार दिनांक ०६/०७/२०१८ रोजी दुपारी ०२.०० वाजता इ प्रभाग कार्यालयाचे **"संत ज्ञानेश्वर महाराज"** सभागृहामध्ये आयोजीत करणेत आली होती. सदर सभेस खालीलप्रमाणे मा.नगरसदस्य उपस्थित होते.

१) मा.श्रीम.भिमाबाई पोपट फुगे **- अध्यक्षा**
२) मा.श्रीम.बुर्डे सुवर्णा विकास
३) मा.श्री.डोळस विकास हरिचंद्र
४) मा.श्री.उंडे लक्ष्मण धोंडू
५) मा.श्रीम.गायकवाड निर्मला मनोज
६) मा.श्री.सागर बाळासाहेब गवळी
७) मा.श्रीम.बारसे प्रियांका प्रविण
८) मा.संतोष (आण्णा) ज्ञानेश्वर लोंढे
९) मा.प्रा.सोनाली दत्तात्रय गव्हाणे
१०) मा.Adv.नितीन ज्ञानेश्वर लांडगे
११) मा.श्री.बुर्डे अजित प्रताप - स्विकृत सदस्य
१२) मा.श्रीम.तापकीर साधना सचिन - स्विकृत सदस्य
१३) मा.श्री.लांडे विजय नामदेव - स्विकृत सदस्य

तसेच खालीलप्रमाणे अधिकारी/कर्मचारी उपस्थित होते.

मा.श्री.श्रीनिवास दांगट - क्षेत्रीय अधिकारी, श्री.थेऊरकर अनिल- प्र.प्रशासन अधिकारी, श्री.निकम एम.बी.लेखाधिकारी - श्री.जीवन गायकवाड-कार्यकारी अभियंता (स्थापत्य), श्री.संजय भोसले- कार्यकारी अभियंता (जलनि:सारण), श्री.विकास मो.आल्हाट – अतिरिक्त कार्यकारी अभियंता- म.रा.वि.वि.भोसरी विभाग, श्री.बी.पी.लांडे उपअभियंता (विद्युत). श्री.राजेंद्र शिंदे-उपअभियंता (स्थापत्य), श्री.चौरे शिवाजी - उपअभियंता (बांधकाम परवानगी), श्री.दवंडे एस.के.- उपअभियंता (पाणीपुरवठा, श्री.वहिकर एस.एस.-प्र. उपअभियंता (पाणीपुरवठा), श्री.जाधव व्ही.के.उपअभियंता (स्थापत्य उद्यान), श्री.प्रभाकर तावरे - सहा.आरोग्य अधिकारी, श्री.अ.व.गुमास्ते - प्र.मुख्य आरोग्य निरीक्षक, श्री.क्षीरसागर आर.व्ही.-क.अभियंता (स्थापत्य.), श्री.कोतकर पी.बी.-क.अभियंता (पाणीपुरवठा), श्री.बेळगांवकर सुनिल एस. - क.अभियंता (पाणीपुरवठा), श्री.पवार वैभव –क.अभियंता (विद्युत), श्री.संदीप ठोकळे - क.अभियंता (ज.नि.), श्री.शितोळे एस.बी. क.अभियंता (ज.नि.), श्री.शेलार ए.बी.- क.अभियंता (ज.नि.), श्री.कु-हाडे एस.एस..-क.अभियंता (विद्युत), श्री.निखील फेंडर- क.अभियंता (स्थापत्य उद्यान), श्री.म्हेत्रे एच.जे.- उद्यान सहाय्यक, श्री.कोंढरे एस.आर.- कार्या.अधिक्षक (अतिक्रमण क व इ), श्री.गायकवाड पी.आर.

मुख्याध्यापक माध्य. विद्यालय, भोसरी, श्री.फुगे एन.जे. प्र.क्रीडा पर्यवेक्षक, श्री.साळुंके जे.जे. – मुख्याध्यापक माध्य. विद्यालय, भोसरी, श्रीमती पवळे जयश्री रविंद्र- समुह संघटक- नागरवस्ती विकास योजना

-------

**मा.अध्यक्षा -** सर्व सन्मा.सदस्य व अधिकारी यांचे स्वागत करुन सभेला सुरवात करणेत येत आहे.

------

**उपस्थित सन्मा.सदस्यांचे संमतीने खालील ऐनवेळचे विषय सभाकामकाजात दाखल करुन घेणेत आले.**

------

**विषय क्रमांक** १. इ प्रभागाच्या दिनांक ६/७/२०१८ च्या सभेत खालील ठराव मंजूर करणेबाबत मा.सौ.निर्मला मनोज गायकवाड यांचे दिनांक ६/७/२०१८ चे पत्र.

**विषय क्रमांक** २.इ प्रभाग समितीच्या मासिक सभेच्या वेळेबाबत श्रीम.भिमाबाई पोपट फुगे अध्यक्षा याचे दिनांक ०६/०७/१८ चे पत्र.

**विषय क्रमांक** ३. भोसरी फाटा असे नाव देणेबाबत मा.Adv.नितीन ज्ञानेश्वर लांडगे यांचे दिनांक ६/७/२०१८ चे पत्र.

**विषय क्रमांक** ४. इ क्षेत्रीय कार्यालयामध्ये नागरवस्ती विकास योजना विभागातील समाजसेवक/ समुहसंघटक कायम नेमणूक करणेबाबत.मा.भिमाताई पोपट फुगे-सभापती यांचे दिनांक ६/७/२०१८ चे पत्र

-------

अ) दिनांक **०४/०६/२०१८** रोजी झालेल्या सभेचा (कार्यक्रमपत्रिका ३ ) सभावृत्तांत कायम करणेत आल्याचे मा.सभापती यांनी प्रकट केले.

------

**उपस्थित सन्मा.सदस्यांचे संमतीने खालील ऐनवेळचे विषय सभाकामकाजात दाखल करुन घेणेत आले.**

-------

ठराव क्रमांक - **१०** विषय क्रमांक- १

दिनांक- - **०६/०७**/२०१८

सूचक- मा.निर्मला गायकवाड अनुमोदक – मा. विकास डोळस

संदर्भ - इ प्रभागाच्या दिनांक ६/७/२०१८ च्या सभेत खालील ठराव मंजूर करणेबाबत मा.सौ.निर्मला मनोज गायकवाड यांचे दिनांक ६/७/२०१८ चे पत्र.

वरील विषयाला अनुसरुन विनंती अर्ज करते की, खालील ठराव देत आहे.

१) स.नं.१, पुणे आळंदी रोड श्री.नामदेव परांडे यांचे घराकडे जाणा-या रस्त्याचे नामकरण **नेताजी सुभाष चंद्र बोस मार्ग.**

**२) अ.** स.नं.१–२पुणे आळंदी रोडच्या पुर्व बाजूस श्री.कुंडलीक सांडभोर यांच्या घराकडे जाणा-या रस्त्याचे नामकरण – **मित्र सहकार नगर गल्ली नं.१**

**ब.** स.नं. १.२ पुणे आळंदी रोडवरुन गायकवाड नगर कडे जाणा-या रस्त्याचे नामकरण – **मित्र सहकार नगर गल्ली नं.२** राघव मंगल कार्यालयाकडे.

**क.** स.नं. २ पुणे आळंदी रोडच्या बाजूस श्री.बाळकृष्ण आगरवाल यांच्या घराकडे जाणा-या रस्त्याचे नामकरण – **मित्र सहकार नगर गल्ली नं.३.**

**ड.** पुणे आळंदी रस्त्याच्या पश्चिमेस श्री.बाळकृष्ण कदम यांच्या घराकडे जाणा-या रस्त्याचे नामकरण- मित्र सहकार नगर.

**३)** पुणे आळंदी रस्ता दिघी गावठाण विठ्ठल मंदिर-महोदव मंदिरा समोरील चौकाचे नामकरण **राजमाता जिजाऊ चौक** असे करण्यात यावे.

**४)** पुणे आळंदी रोडवरुन गावठाण कडे जाणा-या रस्त्याचे नामकरण – **समाज भूषण स्वर्गीय पोपटलाल बन्सीलाल डाबी पथ.**

वरीलप्रमाणे नामकरणाबाबतचे विषयास मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला

------

ठराव क्रमांक - ११ विषय क्रमांक- २

दिनांक- - ०६/०७/२०१८

सूचक- मा.सौ.प्रियांका बारसे अनुमोदक – मा.संतोष लोंढे

संदर्भ - इ प्रभाग समितीच्या मासिक सभेच्या वेळेबाबत श्रीम.भिमाबाई पोपट फुगे यांचे ०६/०७/२०१८ चे पत्र.

इ प्रभाग समितीच्या मासिक सभेची वेळ दर महिन्याच्या पहिल्या शुक्रवारी सकाळी ११.०० वा.घेण्यास मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला

------

ठराव क्रमांक - १२ विषय क्रमांक- ३

दिनांक- - ०६/०७/२०१८

सूचक- मा.संतोष लोंढे अनुमोदक – मा. सागर गवळी

संदर्भ **"भोसरी फाटा"** असे नाव देणेबाबत Adv.नितीन ज्ञानेश्वर लांडगे यांचे दिनांक ०६/०७/२०१८ चे पत्र.

विश्रांतवाडी ते आळंदी या रस्त्यावरुन आल्यानंतर डाव्या बाजूला वळण घेतल्यानंतर भोसरीला जाता येते. त्याचप्रमाणे आळंदीवरुन आल्यानंतर त्याच फाट्यावर उजवीकडे वळण घेतल्यानंतर भोसरीकडे रस्ता जातो. नुकतेच रस्ता रुंदीकरण झाल्यामुळे ब-याचदा बाहेर गावांवरुन आलेल्या नागरीकांची फसगत होते व वळण लवकर घेता येत नाही. त्यामुळे सदर वळणफाट्यावर **"भोसरी फाटा"** असा मोठा बोर्ड लावावा व सदर चौकाचे **"भोसरी फाटा"** असे नामकरण करण्यास व त्याबाबत त्वरीत आजच्या सभेत ठराव संमत करुन संबंधीत विभागाला सुचित करण्यास मान्यता देणेत आली आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला

------

ठराव क्रमांक -१३ विषय क्रमांक- ४

दिनांक- - ०६/०७/२०१८

सूचक- मा.Adv.नितीन ज्ञानेश्वर लांडगे अनुमोदक – मा.प्रा. सोनाली गव्हाणे

संदर्भ - इ क्षेत्रीय कार्यालयामध्ये नागरवस्ती विकास योजना विभागातील समाजसेवक/ समुहसंघटक कायम नेमणूक करणेबाबत.मा.भिमाताई पोपट फुगे-सभापती यांचे दिनांक ६/७/२०१८ चे पत्र

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या इ क्षेत्रीय कार्यालयांतर्गत प्रभाग क्रमांक ३,४,५,७ या प्रभागांचा समावेश होतो. या प्रभागातील नागरीकांना नागरवस्ती विकास योजना विभागातील विविध कल्याणकारी योजनांची माहिती व बचत गटातील महिलांना मार्गदर्शन त्याचप्रमाणे सन्मा.नगरसदस्य यांना याबाबत घ्यावयाचे वेळोवेळी प्रशिक्षणकामी नागरवस्ती विकास योजना विभाग, मुख्य कार्यालय, पिंपरी – १८. या ठिकाणी जाऊन पाठपुरावा करावा लागतो. पुरेपुर माहिती व योग्य मार्गदर्शन मिळत नाही. त्यामुळे अनेक सर्वसामान्य नागरीक कल्याणकारी योजनांपासून वंचित राहतात. यामुळे सन्मा.सदस्यांना त्यांच्या रोषास सामोरे जावे लागते. तरी इ क्षेत्रीय कार्यालयामध्ये नागरवस्ती विकास योजना विभागाकडून  समाजसेविका/ समुह संघटक यांची नेमणूक करण्यास मान्यता देणेत येत आहे. सभावृत्तांत कायम होणेची वाट न पाहता ठरावाप्रमाणे कार्यवाही करण्यात यावी.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला

-------

**मा. अध्यक्ष -** यानंतर मा.अध्यक्षा यांनी सभा संपल्याचे जाहीर केले.

सही/-
अध्यक्षा
इ प्रभाग समिती
भोसरी – ३९.

पिंपरी चिंचवड महानगरपालिका
इ क्षेत्रीय कार्यालय, भोसरी – ३९
क्र-इक्षेका/कावि/४/१६६/२०१८
दिनांक- २१/०७/२०१८.

सही/-
प्रशासन अधिकारी तथा सचिव
इ क्षेत्रीय कार्यालय
भोसरी – ३९.

प्रत- सर्व संबंधित शाखाप्रमुख व शाखाधिकारी
यांचेकडे पुढील योग्य त्या कार्यवाहीसाठी रवाना.

**दिनांक ०६/०७/२०१८ रोजी दुपारी ०२.०० वाजता इ प्रभाग कार्यालयाचे मासिक सभेत खालीलप्रमाणे मा.नगरसदस्यांनी चर्चा केली.**

**मा.प्रियांका बारसे-** मा.क्षेत्रीय अधिकारी यांनी ओळख करुन दयावी.

**मा.क्षेत्रीय अधिकारी –** इ क्षेत्रीय कार्यालयामध्ये पुर्वी प्रशासन अधिकारी म्हणून काम केले होते. आता मी तीन आठवडयापासून क्षेत्रीय अधिकारी म्हणून मा.आयुक्त साहेब यांचे आदेशानुसार चार्ज घेतला आहे. यापुर्वी मी "**ग**" क्षेत्रीय कार्यालय थेरगांव या ठिकाणी प्रशासन अधिकारी म्हणून काम करीत होतो.

पुढच्या आठवडयापासून सर्वांच्या घरी जाण्याचा उपक्रम करणार आहे.

**मा.प्रियांका बारसे –** उद्यान विभागाचे श्री.सटाणे यांनी फूटपाथवर असलेली झाडे तोडता येत नाही असे सांगितले. पेव्हींग ब्लॉक वाया जातात. झाडांची मुळे वाढणार असे म्हणाले. परंतू नागरीकांची मागणी आहे की, वॉकींग ट्रॅकवर झाडे नको. मागच्या महिन्यात मिटींगमध्ये झाडे तोडण्याबाबत म्हणाले होते. आणि आता झाडे तोडणार नाही असे सांगतात त्याबाबत त्यांनी लेखी उत्तर देण्यात यावे.

**मा.सागर गवळी –** पाण्याबाबत खूप तक्रारी आहेत. त्यामुळे पाणीपुरवठया बाबत काही तरी नियोजन करावे. पुढच्या दहा वर्षात नागरीकांना पाण्याचा त्रास होणार नाही असे नियोजन करावे. चक्रपाणी वसाहत येथील खूप तक्रार आहे.

**मा.दवंडे- उपअभियंता (पाणीपुरवठा)** -मा.आमदार यांनी जे काम सांगितले आहे ते काम केलेले आहे.

**मा.सागर गवळी –** नागरीकांची दिशाभूल करीत आहात. काही टेक्निकल अडचणी असतील तर सांगितले पाहिजे.

**मा.दवंडे- उपअभियंता (पाणीपुरवठा)** – पुढच्या आठवडयात पाईप लाईन जोडून होईल.

**मा.सागर गवळी –** कच-याची गाडी तीन तीन दिवस जात नाही. कच-यामुळे रोगराई पसरायला लागली आहे. ड्रायव्हर दादागिरीची भाषा करतात. वेळेवर कच-याची गाडी येत नाही व एकदा कचरा दिला तर मुद्दाम गाडी थांबवायची नाही. चुकीच्या पध्दतीने काम चालले आहे.

**मा.प्रभाकर तावरे- सहा आरोग्याधिकारी -** याबद्दल काम चालू केले आहे. मी प्रत्यक्ष जागेवर जाऊन भेट देणार आहे.

**मा.प्रियांका बारसे –** संकलन केंद्राबाबत काही नियोजन करता येईल का?

**मा.प्रभाकर तावरे- सहा आरोग्याधिकारी –** नगररचना व विकास विभागाकडील आरक्षण असायला हवे. सखुबाई गवळी उद्यानामध्ये संकलन केंद्र चालू केले आहे. खालच्या बाजूला संकलन केंद्र अद्यावत आहे.

**मा.प्रियांका बारसे –** वॉर्डमध्ये धूर फवारणी करण्यात यावी.

**श्री.डामसे –** सध्या दोन गाडया उपलब्ध आहेत त्यामुळे दिवसभर औषध फवारणी करण्यात येईल. चार महिन्याच्या कालावधीसाठी औषध फवारणीची गाडी रेग्युलर असते.

**मा.प्रियांका बारसे -** एक दोन वेळा मला वॉर्डमध्ये घेऊन जा. मला पण फिरायचे आहे वॉर्डमध्ये. प्रत्येक वॉर्डमध्ये फिरुन सर्व्हेक्षण करतात का?

**मा.प्रभाकर तावरे- सहा आरोग्याधिकारी-** आपले जे सर्व्हेक्षण आहे ते कर्मचा-यांकडून प्रत्येक ठिकाणी केले जाते. सर्वप्रथम कर्मचारी टेरेसवर सर्व्हेक्षण करतात. पावसाचे पाणी शुध्द असते. नंतर घरामध्ये सर्वत्र पाहिले जाते. ज्या ठिकाणी पाण्यामध्ये काही आढळले तर कर्मचारी पाचशे रुपये दंड करतात. आपलेकडे कंटेनर्स आहे. सगळीकडील कचरा घेतला जातो.

**मा.प्रियांका बारसे –** शास्तीकर मूळ ड्राफ्ट मिळाला पाहिजे.

**मा.क्षेत्रीय अधिकारी -** करसंकलन विभागाकडून शास्तीकर मूळ ड्राफ्ट मिळत असतो.

**मा.सागर गवळी –** राहुलपार्क मध्ये व चेअरमनचे घरासमोर ड्रेनेजचा प्रॉब्लेम खूप आहे. रस्त्याचा भाग खाली गेला आहे. त्यामुळे अपघात होण्याची शक्यता आहे त्या ठिकाणी अवस्था काय आहे ते पाहून त्वरीत ड्रेनेजचे काम करण्यात यावे. चोकअप करणारे लोक ड्रेनेजचे अर्धवट काम करतात. आरोग्याचे कर्मचारी साफसफाई करतात व कचरा त्याच ठिकाणी पोत्यात भरुन ठेवतात व निघुन जातात. चेंबर साफ करुन गाळ काढणेत यावा.

**मा. संजय भोसले- कार्यकारी अभियंता (जलनि:सारण),** – कचरा उचलण्याचे मशीन कचरा उचलण्यासाठी व्यवस्थित जात नाही. मॅन्युअल बॅकेटसारखी ती मशिन आहे. त्याने कचरा उचलता येत नाही.

**मा.सागर गवळी –** सखुबाई गवळी उद्यानातील लेझर शो लवकर चालू करण्यात यावा. अपुर्ण राहिलेले काम पुर्ण करा.

**मा.प्रियांका बारसे-** महादेवनगर चौकातील पाण्यामध्ये विद्यार्थी वाहून गेला तर याबाबत कोणाला जबाबदार धरणार आहे. तेथील रस्ता छोटा आहे तो मोठा करण्यात यावा. लहान मुलांच्या जीवासाठी तरी काम करण्यात यावे.

**मा.संतोष लोंढे –** स.नं.५ ब्लॉक नं.८ या ठिकाणी कंटेनर्स जात नाही. अर्धा रस्ता कच-याने भरलेला असतो. नागरीकासाठी शौचालय साफ केले जात नाही. नेमके याचे काय कारण आहे? काही झोपडपट्टीमध्ये खूप कचरा आहे. याठिकाणी स्लम एरिया आहे परंतू येथील नागरीक करदाते आहेत. पालिकेला टॅक्स भरतात. परंतू त्यांना सुविधा पुरविल्या जात नाही

**मा.प्रभाकर तावरे- सहा आरोग्याधिकारी-** उद्या मी स्वत: त्या ठिकाणी जाऊन बघतो. तसेच मुख्य आरोग्य निरीक्षक व आरोग्य निरीक्षक यांनाही बोलावतो. व तेथील काम करायला लावतो.

**मा.संतोष लोंढे** - गव्हाणेवस्ती येथील ड्रेनेजचे काम करीत नाही. जे कामे करीत नाही त्यांना ब्लॅक लिस्टला का घेऊ शकत नाही. ड्रेनेजचे काम केल्यावर ड्रेनेज लाईन क्लिअर होईल. आदिनाथनगर येथील कामे व्यवस्थित करुन घ्या. अमृत योजनेबाबत सर्व नगरसेवकांना सांगण्यात यावे. प्रत्येक वॉर्डमधील ड्रेनेजचे काम व्हावे याकरीता हप्त्याला व्हिजीट दया.

**मा.सागर गवळी** - कच-याच्या गाडीचे लोक येत नाही. राधानगरी येथे पाण्याची खूप ओरड आहे. याठिकाणचे नागरीक पाण्यासाठी नियमितपणे फोन करतात. त्यासाठी नियोजन आवश्यक आहे. शांतीनगरचे पाण्याचे टाकीवर जे कर्मचारी काम करीत असतील त्यांना शिस्त लावा. नाहीतर त्यांच्या बदल्या करा.

**मा. विकास डोळस –** मागच्या मिटींगमध्ये आम्ही सर्व नगरसवेक पोटतिडकीने बोलत होतो परंतू त्या विषयावर काहीही झालेले नाही. स्वच्छ भारत अभियान अंतर्गत झोपडपट्टीमध्ये सार्वजनिक शौचालय बांधणेबाबत काय करीत आहात. एसटीपी झालेले नाही. झोपडपट्टीमधील कामे होत नाही. त्यासाठी काही तरी मार्ग काढला पाहिजे.

**मा.प्रभाकर तावरे- सहा आरोग्याधिकारी –** लाभार्थी सुरुवातीला अर्ज करतात तो ऑनलाईन रजिस्ट्रेशन् होतो. बांधकाम झाल्यानंतर फोटो अपलोड करण्यात येतो. त्यानंतर स्थापत्य, जलनि:सारण विभागाचा अहवाल प्राप्त होतो. त्यानंतर संबंधीतास शौचालयकरीता स्वच्छ भारत अभियान अंतर्गत अनुदान दिले जाते.

**मा.सागर गवळी –** फुगेवस्ती, या ठिकाणी ७, ८ पाईप लाईन टाकून ६, ७ टॉयलेट बांधलेले आहे. परंतू कुठलीही सुविधा उपलब्ध नाही.

**मा. संजय भोसले- कार्यकारी अभियंता (जलनि:सारण)** - सध्या तो विषय मा. स्थायी समितीमध्ये आहे. त्याबाबत आमचेकडे ताबा नाही.

**मा.शिनकर प्रेरणा – उपअभियंता (स्थापत्य)** – आरोग्य विभागाला साफसफाई करुन घेण्याबाबत दोन पत्र दिलेली आहे. परंतू नागरीक तसेच टॉयलेट वापरतात.

**मा.प्रभाकर तावरे- सहा आरोग्याधिकारी -** पाणीपुरवठा विभागाने पाण्याची व्यवस्था करण्यात यावी. पाणी नसल्यामुळे शौचालयाची स्वच्छता करणे शक्य होत नाही.

**मा.संतोष लोंढे-** च-होली येथील देवकर वस्ती मा.महापौरांचा वॉर्ड असून तेथे पाण्याचे तळे साचलेले आहे. मी व्हीजीटला गेलो तेंव्हा प्रत्यक्ष पाहिले. सर्वच कामे ५,६ माणसे काय करणार आहे. ते HOD व JE चे काम आहे. त्यांनी प्रत्यक्षात पाहिले पाहिजे.

**मा.क्षेत्रीय अधिकारी** - HOD मिटींगला मा.आयुक्त यांनी याबाबत सुचना केलेल्या आहेत.

**मा.सागर गवळी** – सगळीकडील झाडे वाढलेली आहे. डी.पी.च्या बाजूलाच झाडे आहे. त्यामुळे सारखी लाईट जाते. भोसरी गावात एक एक दिवस लाईट येत नाही. त्यामुळे झाडे तोडण्यात यावी.

**मा.नितीन लांडगे -** भोसरी गावठाण येथे सारखी लाईट जाते व लवकर येत नाही. MSEB बरोबर संपर्क केला असून त्यांनी तेथील वायर नसल्यामुळे लाईट जाते असे सांगितले. लाईट गेल्यावर बरेच गैरप्रकार घडतात. त्यामुळे विद्युत विभागाकडून सगळीकडे स्ट्रीट लाईटची व्यवस्था करण्यात यावी.

**मा.सौ.भिमाबाई फुगे, सभापती** – खंडोबा माळ येथील स्वच्छता अजिबात होत नाही. आरोग्य विभागाकडून स्वच्छता करण्यात यावी. तसेच विद्युत विभागाकडून सीसीटीव्ही कॅमेरे बसविण्यात यावे.

**मा.लांडे – उपअभियंता (विद्युत)** - स्मार्ट सीटीमध्ये सीसीटीव्ही कॅमेरे बसविण्यात येतील.

**मा.नितीन लांडगे -** इंद्रायणीनगर सारख्या ठिकाणी सीसीटीव्ही कॅमेरे बसविण्यात आले आहे. आमचेकडे आवश्यकता असताना आम्हाला मिळत नाही. आमच्या येथे गाडया फोडायचे प्रकार चालू आहेत. सीसीटीव्ही कॅमेरेमुळे ब-याच गोष्टी निदर्शनास येतील.

**मा.लांडे – उपअभियंता (विद्युत)** - क प्रभागाकडून सीसीटीव्ही कॅमेरे बसविण्यात आले आहे. हा विषय वर्गीकरणाचा आहे.

**मा. विकास डोळस** - वर्गीकरणाचा विषय आम्हाला कळत नाही. दहा कोटीची तरतूद मिळवून दिली आहे. इ प्रभागाला थोडा निधी आहे तो वाढवून घेतला पाहिजे. प्रत्येक विभागाला तरतूद करुन घेतली पाहिजे.

**मा.सुवर्णा बुर्डे** – आमचेकडे पाण्याची टाकी व्यवस्थित भरत नाही. पाणी व्यवस्थित सोडत नाही. नवीन पाण्याच्या पाईप लाईनची गरज आहे. ताजणेमळा, ताजणेवस्ती व बाकी ठिकाणी पाणीपुरवठा व्यवस्थित होत नाही. पाण्याच्या बाबतीत काही तरी सोय करण्यात यावी.पहिल्या पाण्याच्या टाक्या व्यवस्थित भरण्यात याव्यात. तरच सगळयांना पाणी मिळेल.

आमचेकडे सतत ड्रेनेज चोकअप होत आहेत. दहा महिन्यापासून ड्रेनेज विभागाला ड्रेनेजबाबत तकार करीत आहे. परंतू कोणीही दखल घेत नाही.

**मा.शितोळे – कनिष्ठ अभियंता (जलनि:सारण विभाग)-** नवीन ड्रेनेज लाईन चालू केली आहे. दोन अजून लाईन चालू करायची आहे. ज्या ठिकाणी चोकअप असतील ते काढून घेतो.

**मा.सुवर्णा बुर्डे** – कच-याच्या गाड्या दोन तीन दिवस येत नाही. सगळयाच बाबींचा प्रॉब्लेम आहे. सफाई कामगार साफसफाई करीत नाही. टाळाटाळ करीत असतात. आमचेकडे नाले भरपूर आहेत. त्यांची सफाई करण्यात यावी.

**मा.शेलार – कनिष्ठ अभियंता (जलनि:सारण विभाग)-** एक नाला फुटला आहे. मटेरियल पडले आहे. काम करुन देण्यात येईल.

**मा.सौ.भिमाबाई फुगे, सभापती** – प्रत्येक वॉर्डमध्ये औषध फवारणी व धूरफवारणी झाली पाहिजे.

**मा. निर्मला गायकवाड –** सहा महिन्यापासून विद्युत विभागाकडे पाठपूरावा करीत आहे की, माझे प्रभागात दिपमाळ बसविण्यात यावी. सीसीटीव्ही कॅमेरे बसविले पाहिजे. काहीही गैरप्रकार होऊ शकतात. तसेच दिघी येथे कुत्र्यांचा व डुकरांचा नागरीकांना त्रास होत आहे. येथील ब-याच लोकांना कुत्र्याने चावल्यामुळे नागरीकांमध्ये भितीचे वातावरण झाले आहे. डुकरांचाही नागरीकांना खूप त्रास होत आहे.

**मा.क्षेत्रीय अधिकारी –** याबाबत डॉ.दगडे, पशुवैद्यकिय अधिकारी यांना कळविण्यात देण्यात येईल.

**मा.सागर गवळी -** देवकर वस्ती या ठिकाणी खूपच डुकरे फिरत असतात त्याचेसाठी काही तरी केले पाहिजे. अक्षरश: ती डुकरे चेबर फोडतात. मोकाट जनावरे, डुकरे व कुत्र्यांचा मोठया प्रमाणावर नागरीकांना वाहतुकीस त्रास होत आहे. याबाबतही काही तरी करण्यात यावे. मोकाट जनावरे कोणाची आहेत ते पाहिले पाहिजे. पाण्याच्या टाकीचे टेंडर दिले आहे. त्याचे काय झाले ? त्यांना सगळयांना बोलवून मिटींग घ्यावी.

**मा.सौ.भिमाबाई फुगे, सभापती –** आजच्या मिटींगला उपस्थित राहिलेल्या सर्वांचे आभार मानते. व सभा संपल्याचे जाहीर केले.